# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक १६ एप्रिल, २०१३.
## (सकाळी ११.०० ते दुपारी १२.१५ वाजेपर्यंत)

**(अ) लक्षवेधी सूचना - (म.वि.प. नियम १०१ अन्वये) -**

**(१) (मंगळवार, दिनांक ९ एप्रिल, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना )**

**सर्वश्री. विनोद तावडे,** चंद्रकांत पाटील, ॲड. आशिष शेलार, श्री.रामनाथ मोते **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"भिवंडी तालुका व आजुबाजुच्या परिसरात अनधिकृत गोदामांच्या संख्येत दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात होत असलेली वाढ, आजमितीस सुमारे २ हजार अनधिकृत गोदामे या ठिकाणी कार्यरत असणे, शासनाची कोणतीही परवानगी न घेता विविध प्रकारच्या वस्तुंची व घातक रसायनांची साठवणूक त्यात करण्यात येत असणे, यामुळे अनेकदा सदरहू गोदामांना आग लागून झालेली जीवीत व वित्तहानी, कारवाई करण्यास एमएमआरडीए, पोलीस व महसूल विभागाचे अधिकारी स्वतःची जबाबदारी नाकारुन एकमेकांवर आरोप करीत असणे, ही अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत अद्यापी कोणतीच कारवाई करण्यात आलेली नसणे, गोदाम मालक भाड्यापोटी लाखो रुपये मिळवित असताना शासनास मात्र कोणताही महसूल मिळत नसणे, या गोदाम मालकांकडून भाड्याच्या रकमेपैंकी ५० टक्के उत्पन्न शासनाने अनर्जित उत्पन्न म्हणून जमा केल्यास शासनाचे उत्पन्न दरवर्षी १२० कोटी रुपयांनी वाढण्याची शक्यता,शासनाची याबाबत तातडीने करावयाची कारवाई व प्रतिक्रीया."

**(२) (बुधवार, दिनांक १० एप्रिल, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना )**

**प्रा. सुरेश नवले,** सर्वश्री. संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, चरणसिंग सप्रा, सुभाष चव्हाण, डॉ.सुधीर तांबे **वि.प.स.**पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"औरंगाबाद शहराच्या स्थापनेपासून चारशे वर्षापूर्वीचा ऐतिहासिक वारसा

असलेल्या "नहरे अंबरी" या पाणीपुरवठा व्यवस्थेकडे महापालिका व प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याने सदरहू ऐतिहासिक पाणी ठेवा नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, सद्य:स्थितीत पैठणच्या जायकवाडी जलाशयातून शहराला पाणीपुरवठा होत असला तरी, धरणातील अपुरा पाणीसाठा व दुष्काळी स्थितीमुळे तीन दिवसाआड पाणीपुरवठा होत असणे, काही वीटभट्टी मालक "नहरे अंबरी" पाणीपुरवठा व्यवस्था फोडून त्यातील पाण्याचा वापर करीत असणे, संबंधित प्रशासन या गैरवापरास अटकाव करीत नसल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेली चिडीची व असंतोषाची भावना, शासनाने या प्रकरणी त्वरीत करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(३) (सोमवार दिनांक १५ एप्रिल, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना )**

**श्री. पांडुरंग फुंडकर वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"शेगाव (जि.बुलढाणा) येथील मौजे जानोरी या गावातील नळयोजना जलस्वराज्य प्रकल्पातून ग्रामीण पाणीपुरवठा समितीने बांधून पूर्ण केल्यानंतर या समितीने २२ महिने सक्षमपणे गावास पाणी पुरवठा करणे, दिनांक ७ जून, २०१० रोजी बुलढाणा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार समितीने ही योजना जानोरी ग्रामपंचायतीस हस्तांतरीत केल्यानंतर या योजनेतून होणारा पाणीपुरवठा बंद होणे, परिणामी गावातील नागरिकांना नजीकच्या टाकळीधारव, तिवान या गावांवरुन पाणी आणावे लागणे, या योजनेतून पाणी पुरवठा पुर्ववत सुरु होण्यासाठी दिनांक १६ फेब्रुवारी, २०१३ रोजी बुलढाणा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसमवेत झालेल्या बैठकीत स्थानिक लोकप्रतिनिधींनी ही नळ पाणीपुरवठा योजना सुरु करण्याबाबत सूचना करुनही आजतागायत ही योजना सुरु न होणे, परिणामी नागरिकांना भीषण पाणी टंचाईला तोंड द्यावे लागत असणे, त्यांच्यात पसरलेला तीव्र असंतोष, या प्रकरणी शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका."

(४) **श्री. मोहन जोशी वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्यातील रिक्षा चालकांसाठी रिक्षा कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याबाबतचे

आश्वासन अद्याप पूर्ण झाले नसणे, तसेच आश्वासनाप्रमाणे तामिळनाडू राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात ॲटो रिक्षा व टॅक्सी चालकांसाठी सामाजिक सुरक्षा व कल्याणनिधी योजना राबविण्याबाबत पुढे काहीही कार्यवाही झालेली नसणे, सदरहू योजना कामगार विभागामार्फत ॲटोरिक्षा, टॅक्सी, व्हॅन, टेम्पो, लॉरीज व बसेस चालविणाऱ्या चालकांसाठी लागू करण्याची होत असलेली मागणी, योजनेत नोंदणीकृत चालकांना वैयक्तिक अपघात मदत, निवृत्ती योजना, अंत्यसंस्कारासाठी मदत व लग्न कार्यासाठी मदत अशा लाभांचा समावेश करण्याची आवश्यकता, यासाठी अधिभार वसूल करण्याकरिता मुंबई मोटार वाहन कर कायद्यात योग्य ती सुधारणा करणे व कल्याणकारी मंडळ स्थापन करणे याबाबत शासनाचे झालेले दुर्लक्ष परिणामी राज्यातील सर्व रिक्षा व टॅक्सी चालकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कारवाई."

(५) **ॲड. आशिष शेलार,** सर्वश्री. विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, विजय गिरकर **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"कोकणातील विकासाची गती वाढविण्यासाठी त्या विभागात पायाभूत सुविधा निर्माण करणे, शैक्षणिक व आरोग्य विषयक सुविधा निर्माण करणे, पर्यटनाला चालणा देणे यासाठी नवीन योजनांचा कोकण विकास कार्यक्रम सन २००९-१०, सन २०१०-११, सन २०११-१२ या तीन वर्षासाठी निर्णय घेतलेला असणे, कोकण विकास कार्यक्रमाअंतर्गत पर्यटन विभाग, पर्यावरण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग इत्यादी विभागांमार्फत उपक्रम राबविण्यात येत असून, सदर कार्यक्रमाची एकूण किंमत रुपये ५३११.०७ कोटी असणे, सदर कार्यक्रमानुसार दिनांक ३१ मार्च, २०१२ पर्यंत उद्दीष्ट पूर्ण करण्याचे ठरविले असूनही मार्च २०१२ अखेर मंजुर असलेली कामे पूर्ण झाली नसल्याचे निदर्शनास येणे, एकूण तरतुदींपैकी मार्च २०१२ अखेर रुपये ४३२८.४७ कोटी इतका खर्च झाला असणे, सदर कार्यक्रम हा एक पॅकेज म्हणून घोषित केलेला असल्यामुळे यासाठी वेगळी विशेष तरतुद करण्याची आवश्यकता असताना या तीनही वर्षांच्या विभागनिहाय अर्थसंकल्पात तरतुद करणे, मंजूर निधी वेळेत न मिळणे, तसेच, सदर योजनेचा कालावधी संपल्यामुळे मंजूर निधीही वितरीत न होणे, रुपये ४३२८.४७ कोटी खर्च केला असला तरी कोकणामध्ये कोणताही विकास अथवा मोठे प्रकल्प आढळून येत नसणे, यामुळे कोकणवासीयांच्या मनात शासनाप्रति

निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **श्री. विनायक राऊत वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"सावंतवाडी तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) इन्सुली-क्षेत्रफळ येथील मे.रत्नागिरी पॉवरलुम व्हिव्हर्स को.ऑप.स्पिनिंग मिलला १९७६-७७ मध्ये कवडीमोल दराने दिलेली १२८ एकर जमीन, सदर सुतगिरणी जास्तकाळ न चालता बंद पडल्याने व राज्य बँकेचे पैसे थकल्यामुळे बँकेने बेकायदेशीर केलेला लिलाव, कायदाभंग करुन सहकारी संस्थेच्या नावे १२६ एकर जमीन करण्यात येणे, त्यामुळे सुतगिरणीसाठी दिलेल्या जमीनी मुळ जमीनधारक शेतकऱ्यांना परत मिळाव्यात अशी ग्रामस्थांनी महसूल खात्याकडे केलेली मागणी, परंतु आतापर्यंत कोणतीच कार्यवाही होत नसल्याने जमीनधारक शेतकऱ्यांनी व ग्रामस्थांनी सुरु केलेले आंदोलन, शासनाने याप्रकरणी तातडीने केलेली वा करावयाची कारवाई."

(७) **श्री. कपिल पाटील वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"माहिती तंत्रज्ञान या विषयाची एचएससी बोर्डाची परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येत असणे, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी साठी आयसीटी विषय अभ्यासक्रमात सक्तीचा केला असणे, मात्र हा विषय विनाअनुदानित ठेवला असल्यामुळे ग्रामीण आणि शहरी भागातील गरीब, शेतकरी, दलित, आदिवासी, मागासवर्गीय आणि अल्प उत्पन्न गटातील सर्वसामान्य त्यापासून मुलांना वंचित राहवं लागणे, हा विषय अनुदान तत्वावर राज्यात सर्वत्र सुरु करण्याची आवश्यकता, या विषयाच्या शिक्षकांना वैयक्तिक मान्यता देण्याची आणि वेतन अनुदान सुरु करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने दखल घेऊन तातडीने करावयाची उपाययोजना, केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(८) **सर्वश्री. सुभाष चव्हाण,** संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **कामगार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"तळोजा औद्योगिक वसाहतीतील (ता.पनवेल, जि.रायगड) मे.दिपक

फर्टीलायझर्स ॲन्ड पेट्रोकेमिकल्स कार्पोरेशन लि. या कंपनीमध्ये दिनांक ३ जानेवारी, २०१३ पासून कामगारांचा सुरु असलेला संप, कामगार संघटनेने कपंनीतील विविध समस्यांबाबत मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २१ जानेवारी, २०१३ रोजी वा त्यासुमारास निवेदनही दिलेले असणे, सदर निवेदनास एक महिना उलटूनही व्यवस्थापन याबाबत कोणतीही चर्चा करण्यास तयार नसणे, तसेच मा.कामगार मंत्री यांनी याप्रकरणात मध्यस्थी केली असता कंपनीचे वरिष्ठ अधिकारी गैरहजर राहणे, त्यामुळे कामगारांना न्याय न मिळणे, होत असलेल्या दिरंगाईमुळे कामगारांवर उपासमारीची वेळ येणे, यामुळे कामगारांमध्ये व जनतेमध्ये पसरलेले तीव्र चिंतेचे व असंतोषाचे वातावरण, परिणामी दिनांक २ मार्च, २०१३ रोजी संप मोठ्याप्रमाणात चिघळला असणे, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(ब) म.वि.प. नियम ९३ अन्वये निवेदने - (असल्यास).**

## (दुपारी १२.३० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

**(अ) तारांकित प्रश्न.**

**(ब) तारांकित प्रश्नाची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री :** : "सार्वजनिक आरोग्य खात्यामार्फत औषधांची परराज्यातून करण्यात आलेली खरेदी" या विषयावरील डॉ.दिपक सावंत, वि.प.स. यांनी सन २००८ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात उपस्थित केलेल्या अर्धातास चर्चेच्यावेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे -**

**(१) मा.मुख्यमंत्री** : "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उद्योग मंत्री** : **(अ)** "महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स महामंडळ मर्यादित यांचा सन २०११-२०१२" या वर्षाचा चौतीसावा

वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ब)** "महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ मर्यादित यांचा सन २०१०-२०११" या वर्षाचा तिसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(३) जलसंपदा (कृष्णा खोरे - पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** : **(अ)** "महाराष्ट्र सिंचन विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा वार्षिक अहवाल व परिसमापकांचा अंतिम अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ब)** "महाराष्ट्र भूविकास महामंडळ मर्यादित यांचा सन २००८-२००९, २००९-२०१० व २०१०-२०११ या वर्षांचे वार्षिक अहवाल व ताळेबंद - नफा तोटा पत्रक" सभागृहासमोर ठेवतील.

**(४) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : "संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांचे सन २०१०-२०११ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(५) महिला व बालविकास मंत्री** : "महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचा सन २००९-२०१० या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : अंदाज समितीचा एकोणतिसावा व तिसावा अहवाल सादर करणे.**

**चार : विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा पाचवा व सहावा अहवाल सादर करणे.**

**पाच : पंचायती राज समितीचा तेरावा व चौदावा अहवाल सादर करणे.**

**सहा : आश्वासन समितीचा एकशे बहात्तर, एकशे त्र्याहत्तर, एकशे चौऱ्याहत्तर, एकशे पंच्याहत्तर, एकशे शहात्तर व एकशे सत्त्यातरावा अहवाल सादर करणे.**

**सात : म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

**आठ : <u>मा.समिती प्रमुख, विशेषाधिकार समिती यांचा प्रस्ताव-</u>**

"विधानपरिषद विशेषाधिकार समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या,-

श्री.पुरुषोत्तम खेडेकर लिखित "शिवरायाच्या बदनामीची केंद्रे" या पुस्तकातील मजकुरांवर आधारित "लोकप्रभा" अंकामधील प्रा.हरी नरके यांच्या "फॅसिस्ट शक्तीमुळे बहूजनांचे

विभाजन" या लेखातील अवमानजनक लिखाणामुळे उद्‌भवलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

या प्रकरणांवरील विशेषाधिकार समितीचा अहवाल सादर करण्याकरिता म.वि.प. नियम १७८ (१) च्या परंतुकान्वये, पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी."

# - मध्यंतर -

**नऊ : शासकीय विधेयके -**

**(अ) विधानसभेने संमत केल्यास - विधेयक विचारात घेणे -**

सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक १२ - महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०१३.

**(ब) विचार पुढे सुरू, खंडशः विचार व संमत करणे -**

सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३.

**क) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४७ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रामदास कदम वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४० सदस्यांच्या

संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(क) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार खंडश: विचार व संमत करणे -**

**(१)** सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक ११ - महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे व सुधारणा) विधेयक, २०१३.

**(२)** सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक १० - मुंबई करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक, २०१३

**(३)** सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक ३ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१३.

**दहा : म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

(अ) **(बुधवार, दिनांक १० एप्रिल, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला परंतु पुढे ढकलण्यात आलेला प्रस्ताव) - (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर) -**

**सर्वश्री. किरण पावसकर,** अशोक ऊर्फ भाई जगताप, हेमंत टकले, जयप्रकाश छाजेड, प्रकाश बिनसाळे, सुभाष चव्हाण, विक्रम काळे, निरंजन डावखरे, मुझफ्फर हुसेन सय्यद, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री.जयवंतराव जाधव, नरेंद्र पाटील, ॲड. जयदेव गायकवाड, श्री. रमेश शेंडगे, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

देशाची आर्थिक राजधानी व सर्वात जास्त उत्पन्न असणारी मुंबई महानगरपालिका तसेच झपाट्याने शहरीकरण होत असलेली ठाणे महानगरपालिका व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकांची विविध समस्यांमुळे होत असलेली दुरावस्था, याठिकाणी वाढत असलेल्या झोपडपट्ट्या व वाढत असलेली लोकसंख्या यामुळे तेथील नागरिकांना नागरी सुविधा न मिळणे, मुंबई महानगरपालिकेत रिक्त असलेले भूखंड विकासकांना देवून त्याठिकाणी टॉवर व मॉल उभे असणे, विकासकांबरोबर संगनमत करुन भूखंड विकासकांच्या ताब्यात देण्याचे सुरू असलेले प्रकार, यात प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार होणे, झोपडपट्टी पुनर्विकास योजनेत अनियमितता असून पात्र झोपडपट्टीधारकांना डावलून बनावट सभासद नोंदवून करण्यात येत असलेला प्रचंड भ्रष्टाचार, म्हाडाच्या संक्रमण शिबिरात सुरू असलेली घुसखोरी, नागरिकांना अत्यंत अपुरा पाणीपुरवठा होणे, यासाठी महिलांनी वेळोवेळी धरणे व आंदोलन करणे, बऱ्याच ठिकाणी अस्वच्छता असून जागोजागी कचऱ्यांचे ढीग असणे, मोठ्या प्रमाणात सुरु असलेली बेकायदेशीर बांधकामे, टपऱ्या भंगारवाल्यानी रस्त्यावर केलेले अतिक्रमण यामुळे नागरिकांना रस्त्यांवरुन चालणेही

जिकिरीचे होणे, मुंबई शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पाईप लाईन्स अत्यंत जीर्ण झाल्या असून पाईप लाईनच्या शेजारी मोठ्या प्रमाणात झोपडपट्टी वाढणे, या झोपडपट्टीत दहशतवादी लपून राहण्याची शक्यता, त्यामुळे सुरक्षेचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, रस्ते दुरुस्तीच्या कामात झालेला कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार, मुंबईत कोलमडून पडलेली वाहतूक व्यवस्था दिवसेंदिवस मालमोटारी व गाड्यांची वाढत असलेली संख्या, वाहतुकीची होत असलेली कोंडी कमी करण्याची व वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याची आवश्यकता, मेट्रोरेल्वे व जलवाहतूक सुरू करण्याबाबत जनतेची होत असलेली मागणी, बऱ्याच ठिकाणी एमएमआरडीएची सुरू असलेली कामे संथगतीने सुरू असणे, या कामात बऱ्याच ठिकाणी

झालेले अपघात, त्यात झालेली प्राणहानी, सांडपाण्याची व्यवस्था सुरळीत न ठेवल्याने दूषित पाण्यामुळे मुंबई शहरात डेंग्यु, मलेरिया रोगाची साथ मोठ्या प्रमाणात पसरणे, यात बऱ्याच लोकांचा झालेला मृत्यु, पावसाळ्यात ठिकठिकाणी पाणी तुंबून मुंबईतील जगजीवन ठप्प होणे, मुंबई, ठाणे व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील बरीचशी नैसर्गिक तलाव व तळी बुजवून त्यावर अनधिकृत बांधकामे सुरू असणे, मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांची झालेली दुरावस्था, रुग्णांना औषधोपचार वेळीच न मिळणे, मुंबईतील फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात महापालिकेला आलेले अपयश, या समस्यांमुळे तेथील जनतेत निर्माण झालेली असंतोषाची भावना, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया विचारात घेण्यात यावी.

(ब) **(बुधवार, दिनांक १० एप्रिल, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला परंतु पुढे ढकलण्यात आलेला प्रस्ताव) -**

**सर्वश्री. विनोद तावडे,** दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील, चंद्रकांत पाटील, डॉ. दिपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री. रामनाथ मोते, सुमंतराव गायकवाड, ॲड. आशिष शेलार, ॲड. अनिल परब, डॉ.रणजीत पाटील, सर्वश्री. नागो गाणार, भगवान साळुंखे **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

"गत ३६ महिन्यात वीजेचे दर तब्बल १२ वेळा वाढणे, औद्योगिक वीजेचे दरदेखील शेजारील राज्यांपेक्षा अधिक असल्याने सर्व उद्योजकांनी एक दिवसाचा लाक्षणिक संप पुकारून तो यशस्वी करणे, वारंवार वीज दरवाढ करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाने कोणताही विरोध न करता मंजूर करणे,

भारनियमनमुक्तीसाठी महानिर्मितीच्या औष्णिक विद्युतनिर्मिती प्रकल्पांची वीजनिर्मिती वाढविण्याची गरज असताना प्रत्यक्षात सद्यःस्थितीत महानिर्मितीच्या औष्णिक वीज प्रकल्पांमार्फत होणारी वीज निर्मिती सन २००८ च्या तुलनेत कमी होणे, तसेच उरण व लातूर येथील गॅसवर आधारित विद्युत निर्मिती प्रकल्पामधून अपेक्षित विद्युत निर्मिती न होणे, प्रत्यक्ष वीजनिर्मितीत वाढ न झाल्याने माहे डिसेंबर, २०१२ अखेर राज्य भारनियमनमुक्त करण्याची घोषणा फसवी ठरणे, कृषीपंपांना मोफत वीज पुरविण्याची घोषणा करूनदेखील कृषीपंप धारकांकडून वाढीव दराने वीज बील आकारण्यात येणे, महाराष्ट्रातील महावितरण, महापारेषण व महाजनको या तीनही कंपन्यांचे कामकाजामध्ये प्रचंड भ्रष्टाचार होत असल्याचे उघडकीस येणे, यामध्ये प्रामुख्याने मीटर खरेदी, कोळसा खरेदी, पायाभूत सुविधांची कामे, महापारेषणमार्फत होणारी कामे इत्यादींचा समावेश असणे, इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील वीज कंपन्यांचे काम समाधानकारक नसल्याचे शुंगलु समितीने देखील आपल्या अहवालात नमूद करणे, परिणामी, वाढत्या वीजदराचा बोजा सामान्य जनतेवर पडत असल्याने त्यांच्यात निर्माण झालेला तीव्र असंतोष, यामुळे या विभागातील कारभाराबाबत श्वेतपत्रिका काढण्याची होत असलेली मागणी व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**अकरा : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये - (बैठकीच्या शेवटी) -**

**(१) श्री. अमरसिंह पंडित वि.प.स.**

"विदर्भ व मराठवाड्यात नविन रेल्वे मार्ग सुरु करणेबाबत" या विषयावरील श्री.राणा जगजितसिंह पाटील, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३२७७८ ला दिनांक १८ जुलै, २०१२ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(२) श्री.विक्रम काळे वि.प.स.**

"सोलापूर-औरंगाबाद-जळगाव या रस्त्याच्या चौपदरीकरणाबाबत" या विषयावरील श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३४६९२ ला दिनांक ११ डिसेंबर, २०१२ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १५ एप्रिल, २०१३.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.